महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


जा.क्र.तंशिविकापु/शै.वि-५/आरोग्य कार्यक्रम /२०२४/ 758
दिनांक : 15 FEB 2024

# परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत/
खाजगी विनाअनुदानित संस्था

**विषय** : किशोरवयीन आरोग्य कार्यक्रम अंतर्गत येणा-या राष्ट्रीय जंतनाशक मोहिम राबविणेबाबत...

**संदर्भ** : महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग मुंबई यांचे पत्र क्र.एनएचएम-११२४/प्र.क्र.१००/आरोग्य-७, दि.१२/०२/२०२४

उपरोक्त विषयाचे संदर्भाधिन पत्र वाचावे

उपरोक्त विषयाचे महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग मुंबई यांचे पत्रानुसार कळविण्यांत येते की दर वर्षी प्रमाणे सन २०२३-२४ मध्ये १ ते १९ वर्ष वयोगटातील राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेकरिता एकूण २,८०,५८,९७९ लाभार्थ्यांना जंतनाशक गोळी देण्यांत येणार असून , या करिता सार्वजनिक आरोग्य विभागाने विविध कार्यक्रमाची रूपरेषा निर्धारीत केलेली आहे. सोबत संदर्भिय पत्र जोडत आहे. त्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत,खाजगी विनाअनुदानित संस्थाप्रमुखांना सुचित करण्यांत येते की सदर आरोग्य कार्यक्रम अंतर्गत येणा-या राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिम यशस्वीपणे करण्याबाबत आपल्या संस्थास्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी.

सोबत - संदर्भिय पत्र

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार,
संकुल इमारत, १० वा मजला, ए-विंग,
मुंबई-४०० ००१.

सार्वजनिक आरोग्य विभाग

दूरध्वनी क्र.०२२-२२६१७५१०/विस्तार- २२४/२३०.

Email ID :rajendre.kudale@nic.in.

---

क्रमांक : एनएचएम-११२४/प्र.क्र.१००/आरोग्य-७

दिनांक : १२/०२/२०२४

प्रति,

१. मा. अपर मुख्य सचिव,
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मा. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४.मा. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

14 FEB 2024
2470

विषय-किशोरवयीन आरोग्य कार्यक्रम अंतर्गत येणा-या राष्ट्रीय जंतनाशक मोहिम राबविणेबाबत.....

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार किशोरवयीन आरोग्य कार्यक्रम अंतर्गत राष्ट्रीय जंतनाशक मोहिम वर्षातुन दोन वेळा राबविण्यात येते. या मोहिमेमध्ये १ ते १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींना जंतनाशक मोहिमे अंतर्गत जंतनाशकाची एक गोळी खाऊ घालण्यात येते.

आतडयांमधील कृमी दोष हा बालकांमध्ये व किशोरवयीन मुला मुलींमध्ये होणाऱ्या रक्तक्षय व कुपोषणास मोठया प्रमाणावर जबाबदार आहे. यामुळे मुला मुलींच्या शिक्षणावर व पुढील आयुष्यातील मिळकतीवर याचा विपरित परिणाम होतो. तीव्र प्रमाणात कृमी दोष असलेले विद्यार्थी हे बरेचदा आजारी असतात, त्यांना लवकर थकवा येतो व अभ्यासाकडे लक्ष केंद्रीत करु शकत नाही, यामुळे ते बरेचदा शाळेत अनुपस्थित असतात. आतडयांतील कृमी दोष हे वैयक्तिक व परिसर अस्वच्छतेमुळे होतात. बालकांमध्ये याचा प्रसार दूषित मातीद्वारे फार सहजतेने होतो. शाळा व अंगणवाडी पातळीवरुन देण्यात येणारी जंतनाशक गोळी ही फार परिणामकारक आहे. या मोहिमेचा उद्देश १ ते १९ वर्ष वयोगटातील मुले व मुली यांचे आरोग्य चांगले ठेवणे पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे हा आहे.

सन २०१४-१५ या वर्षापासून ही मोहिम राबविण्यात येत आहे. दर वर्षीप्रमाणे सन २०२३-२४ मध्ये १ ते १९ वर्ष वयोगटातील राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेकरिता एकुण २,८०,५८,९७९ लाभार्थ्यांना जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे. अंगणवाडी/ शाळा / कनिष्ठ महाविदयालय / वरिष्ठ महाविदयालय (प्रथम वर्ष) या स्तरावर दि. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन व या दिवशी सुटलेल्या मुला मुलींकरिता दि. २० फेब्रुवारी २०२४ रोजी मॉप अप दिन राबवावयाचा आहे. तरी सदरील जंतनाशक दिन मोहिमेदरम्यान अंगणवाडी / शाळा/ कनिष्ठ महाविदयालय / वरिष्ठ महाविदयालयाचे प्रथम वर्ष यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. जेणेकरुन जास्तीत जास्त विदयार्थ्यांना जंतनाशक मोहिमेचा लाभ देता येईल.

राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर आरोग्य, शिक्षण व एकात्मिक बाल विकास विभाग या तीन मुख्य विभागांनी एकत्रित येऊन जंतनाशक मोहिम यशस्वीपणे राबविण्यासाठी व जास्तीत जास्त मुला - मुलींना जंतनाशक गोळी देण्यासाठी प्रयत्न करावा, यासाठी आरोग्य विभाग, शिक्षण विभाग व एकात्मिक बाल विकास विभाग यांच्या समन्वयाने राबविण्यात येणार आहे.

जंतनाशक मोहिम राबविणेसाठी सर्व मार्गदर्शक सूचना, सनियंत्रण साठीचे चेकलिस्ट, अहवाल नमूने, वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) व प्रसिध्दी साहित्य हे सर्व जिल्हयांना व मनपा यांना राज्य कुटुंब कल्याण कार्यालय यांचे स्तरावरुन पाठविण्यात आले आहे.

From Desk 16.

या तीन विभागातील समन्वयासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. राज्य व जिल्हा पातळीवर तीनही विभागांमार्फत नोडल ऑफीसरची नेमणूक करण्यात यावी. कार्यक्रम राबविण्यामध्ये त्यांचा सक्रीय सहभाग असावा. त्याच बरोबर या कार्यक्रमाचे नियमितपणे मुल्यमापन त्यांचे मार्फत करणेत यावे.

२. जंतनाशक मोहिमेकरिता जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समितींची स्थापना करण्यात आलेली आहे. त्याअन्वये जंतनाशक मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणी करिता या समितीची बैठक घेण्यात यावी.

३. शिक्षण विभाग व एकात्मिक बाल विकास विभाग यांनी त्यांच्या अंतर्गत येणा-या एकूण लाभार्थ्यांची संख्या आरोग्य विभागास कळवावी जेणेकरुन त्यांना पुरेशा प्रमाणात जंतनाशक गोळ्यांचा (Albendazole Tabl) साठा आरोग्य विभागाकडून पुरविण्यात येईल.

४. शिक्षण विभागाद्वारे सर्व शासकीय शाळा/शासकीय अनुदानित शाळा/आश्रम शाळा/नगरपालिका महानगरपालिका शाळा, सर्व खाजगी अनुदानित व विना अनुदानित शाळा, आर्मी स्कूल, सी. बी. एस.ई स्कूल, नवोदय विदयालय, सुधार गृह सर्व खाजगी इंग्रजी माध्यमिक शाळा, मदरसे, मिशनरी स्कूल, गुरुकूल, संस्कार केंद्र, सर्व कनिष्ठ महाविदयालय व वरिष्ठ महाविदयालयाचे प्रथम वर्षाचे विदयार्थी नर्सिंग कॉलेज, आय. टी. आय. पॉलिटेक्निक, इंजिनिअरिंग, कला, वाणिज्य व विज्ञान, फार्मसी महाविदयालय, डी. एड. महाविदयालय) यांचा जंतनाशक मोहिमेमध्ये समावेश करुन घ्यावा व अहवाल सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सादर करावा.

५. शिक्षण विभाग व एकात्मिक बाल विकास विभाग यांच्या अधिका-यांचे व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण आरोग्य विभागामार्फत घेण्यात यावे व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर शाळेचे नोडल शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा व आरोग्य सेवक / सेविकेचे प्रशिक्षण वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी घ्यावे. तसेच महानगरपालिका अंतर्गत येणा-या सर्व महानगरपालिका शाळा व खाजगी अनुदानित व विना अनुदानित शाळांच्या शिक्षकांचे व अंगणवाडी कार्यकर्तीचे प्रशिक्षण हे तेथील हेल्थ पोस्टच्या वैदयकीय अधिका-यांनी घ्यावे.

६. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत दिले जाणारे प्रसिध्दी साहित्य शाळा / अंगणवाडी तसेच गावातील प्रमुख ठिकाणी व दर्शनिय भागांमध्ये लावण्यात यावे.

७. सर्व विभागातील अधिका-यांद्वारे राष्ट्रीय जंतनाशक दिन व मॉप अप दिनी संनियंत्रण व पर्यवेक्षणाकरिता क्षेत्रभेटी करण्यात याव्यात व त्यांचा अहवाल आरोग्य विभागाकडे सादर करण्यात यावा.

८. जिल्हा व महानगरपालिका स्तरावरुन वरील सुचनांप्रमाणे सर्व विभागातील एकत्रित सूचना तालुका, प्राथमिक आरोग्य केंद्र व नागरी आरोग्य केंद्र स्तरावर देण्यात याव्यात.

विश्वास आहे. की, आपल्या सहभागाने राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिम यशस्वीपणे संपूर्ण राज्यात राबविण्यात येईल व आपण जास्तीत जास्त लाभार्थ्यांचे आयुष्य आरोग्य वर्धक करण्यास मदत करु.

आपला,

(मिलिंद म्हैसकर)
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी -

१.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२.संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य मुंबई/ पुणे
३.संचालक, तंत्र शिक्षण विभाग, मुंबई
४. संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे
५. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभाग, पुणे
६. संचालक, प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे
७. अतिरिक्त संचालक, राज्य कुंटुंब कल्याण कार्यालय, पुणे
८. कार्यकारी आरोग्य अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ साऊथ वार्ड, परेल मुंबई
९. उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ (सर्व)
१०. उपसंचालक, शिक्षण विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
११.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) जिल्हा परिषद (सर्व)
१२. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३. जिल्हा शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)
१५. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व)

E:\Kudale Sir\Letter\Letter.docx